# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक - एमआयएस-०६१७/सीआर-५०/२०१७/तीन

विषय:- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांबाबत
- उमेदवारांना इशारा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्या वेळी संबंधितांकडून करण्यात येणा-या गैरप्रकाराच्या प्रयत्नांच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाकडून वेळोवेळी आढावा घेऊन विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच भविष्यामध्येही करण्यात येतील. त्याचाच एक भाग म्हणून परीक्षामध्ये गैरप्रकाराचे प्रयत्न करणा-या संबंधित व्यक्तींवर अस्तित्वात असलेल्या कायदयातील तरतुदीनुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधितांना आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा व निवडीकरीता प्रतिरोधित (Debar) करण्यात आले आहे.

**२.** आयोगाच्या संकेतस्थळावरील सर्वसाधारण सूचनांनुसार आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवरील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील माहिती बिनचूक असणे आवश्यक आहे. तसेच प्रोफाईल/अर्जामधील दाव्याच्या आधारे सादर केलेला कोणत्याही प्रकाराचा दावा/माहितीच्या अनुषंगाने (उदा.शैक्षणिक अर्हता, मागास वर्ग, खेळाडू, विकलांग व्यक्ती, मोबाईल दूरध्वनी क्रमांक, पॅनकार्ड, आधार कार्ड इत्यादी) **कोणत्याही टप्प्यावर आवश्यक पुरावा सादर करणे अनिवार्य आहे.** प्रोफाईल/अर्जामधील दाव्याच्या अनुषंगाने आवश्यक असल्यास अशा **कोणत्याही टप्प्यावर पुरावा सादर न केल्यास आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून** व आयोगाची फसवणूक समजून अशा उमेदवारांची संबंधित परीक्षांची उमेदवारी रदद् करण्यात येईल अथवा आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार संबंधित उमेदवाराला प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल. याव्यतिरिक्त संबंधित कायदयातील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्याची कारवाई सुध्दा आवश्यकतेनुसार करण्यात येईल.

मुंबई
दिनांक- ११ फेब्रुवारी, २०१९

उप सचिव/परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

TRIAL MODE - a valid license will remove this message. See the keywords property of this PDF for more information.